नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३२२ Issue - 322 | वार सोमवार दि. १३ एप्रिल २०२६ Blow- Monday Date 13 April 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## ज्येष्ठ गायिका आशा भोसले काळाच्या पडद्याआड

### १० व्या वर्षी पहिलं गाणं गाणाऱ्या 'सूरसम्राज्ञी'चा थक्क करणारा प्रवास


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचं आज निधन झालं असून वयाच्या ९३ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. आशा भोसले यांना हिंदी सिनेसृष्टीची वर्सटाईल गायिका म्हणून ओळखलं जायचं. तब्बल सहा दशकं त्यांनी इंडस्ट्रीत आपल्या गाण्यांना आवाज दिला आहे. त्यांनी केवळ हिंदीतच नाहीतर, मराठी, बंगाली, गुजराती, तमिल, तेलुगुसह अनेक भाषांमध्ये गाणी गायलीत. हिंदी सिनेसृष्टीतील दिग्गज संगीतकार आरडी बर्मन , ओपी नैय्यर, सचिन देव बर्मन, लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांच्यासोबत त्यांनी अनेक अजरामर गाणी गायली. 'दम मारो दम' आणि 'ओम शांति ओम' यांसारखी अनेक सुपरहिट गाणी आशा भोसले यांनी इंडस्ट्रीला दिलीत.

भारतीय संगीत क्षेत्रातील अढळ स्थान असलेल्या ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात उपचारांसाठी दाखल करण्यात आले होते. प्रचंड थकवा आणि छातीत संसर्ग झाल्यामुळे त्यांना उपचारांसाठी दाखल करण्यात आले होते.

आशा भोसले यांनी आपल्या गायन कारकिर्दीची सुरुवात अत्यंत कमी वयात केली होती. एका मुलाखतीत त्यांनी स्वतः सांगितले होते की, १९४३ मध्ये वयाच्या अवघ्या १० व्या वर्षी त्यांनी आपले पहिले मराठी गाणे रेकॉर्ड केले होते. तो अनुभव सांगताना त्या म्हणाल्या होत्या, माझं पहिलं गाणं होतं तेव्हा मी खूप घाबरले होते. माईकसमोर उभं राहून गाणं गायचं होतं आणि मला माईक म्हणजे काय हेदेखील माहीत नव्हतं. पण तिथून सुरू झालेला हा प्रवास आजतागायत अखंड सुरू आहे.

आशा भोसले यांच्या नावावर एक-दोन नव्हे, तर तब्बल २० वेगवेगळ्या भाषांमध्ये १२,००० हून अधिक गाणी गाण्याचा जागतिक विक्रम आहे. यासाठी त्यांची नोंद 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये करण्यात आली आहे. त्यांनी केवळ मराठी आणि हिंदीच नाही, तर इंग्रजी, रशियन, नेपाळी, मल्याळम, तमिळ अशा अनेक भाषांमध्ये आपली जादू पसरवली आहे.



महाराष्ट्र भूषण सारखे अनेक मोठे पुरस्कार त्यांना मिळाले.वेगवेगळ्या चित्रपटांमध्ये गायलेले गाणी त्याची जग प्रसिद्ध झाली. त्यांची अनेक गाणी आजही आवर्जून गायली जातात.

शास्त्रीय संगीत असो, कव्वाली, पॉप किंवा डिस्को गाणी, आशा ताईंनी प्रत्येक प्रकारच्या गाण्याला न्याय दिला. त्यांच्या काही गाजलेल्या गाण्यांची यादी खालीलप्रमाणे आहे:

'पिया तू अब तो आजा' (कारवाँ)

'ये मेरा दिल' (डॉन)

'ओ हसीना जुल्फों वाली' (तीसरी मंजिल)

'दिवाना हुआ बादल' आणि 'इशारों इशारों में' (काश्मीर की कली)

त्यांच्या कलेचा सन्मान म्हणून भारत सरकारने त्यांना 'पद्मविभूषण' आणि चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च 'दादासाहेब फाल्के' पुरस्काराने गौरवले आहे. सध्या संपूर्ण देश आशा ताईंच्या प्रकृतीत लवकरात लवकर सुधारणा व्हावी यासाठी प्रार्थना करत आहे.

आशा भोसले (प्रमुख पुरस्कार)

१. पद्म विभूषण - २००८

२. दादासाहेब फाल्के पुरस्कार - २०००

३. राष्ट्रीय फिल्म पुरस्कार (सर्वश्रेष्ठ महिला प्लेबैक गायिका) - १९८१ और १९८६

४. फिल्मफेयर पुरस्कार (सर्वश्रेष्ठ महिला प्लेबैक गायिका) - १९६८, १९६९, १९७२, १९७३, १९७४, १९७५ और १९७९

५. फिल्मफेयर स्पेशल अवॉर्ड (फिल्म रंगीला) - १९९६

६. फिल्मफेयर लाइफटाइम अचीवमेंट अवॉर्ड - २००१

७. खखक्रुरीवी (सर्वश्रेष्ठ महिला प्लेबैक गायिका) - २००२, फिल्म लगान के गीत राधा कैसे न जले के लिए

८. नाइटिंगेल ऑफ एशिया अवॉर्ड - १९८७

९. सिंगर ऑफ द मिलेनियम - २००० (दुबई)

१०. इइउ लाइफटाइम अचीवमेंट अवॉर्ड - २००२

## स्वरस्वामिनी आशा भोसले यांना पंतप्रधान मोदींनी वाहिली खास मराठीतून आदरांजली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : प्रसिद्ध पार्श्वगायिका आशा भोसले यांचे मुंबईच्या ब्रीच कँडी रुग्णालयात निधन झाले. त्या ९२ वर्षांच्या होत्या. आशा भोसले यांना काल (शनिवार ११ एप्रिल २०२६) हृदयविकाराचा झटका आल्यामुळे ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. आशा भोसलेंची नात झानई भोसले हिने इन्स्टा पोस्ट करून आजी ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार घेत असल्याचे सांगितले होते.

आशा भोसले मागील सात दशकांपासून पार्श्वगायन करत होत्या. त्यांनी मराठी, हिंदीसह अनेक भाषांतील चित्रपटांसाठी पार्श्वगायन केले. चुनरिया या १९४८ मध्ये आलेल्या चित्रपटापासून आशा भोसले यांच्या पार्श्वगायनाच्या कारकिर्दीला सुरुवात झाली. त्यांनी वीसपेक्षा जास्त भाषांमध्ये १६ हजारांपेक्षा जास्त गाणी गायली. मराठी, हिंदी, बंगाली, गुजराती, पंजाबी, भोजपुरी, तमिळ, मल्याळम, इंग्रजी आणि रशियनसह एकूण २० भाषांमध्ये आशा भोसले यांनी पार्श्वगायन केले.



अशातच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खास मराठी भाषेतून आशाताईंना आदरांजली वाहिली आहे.

भारतातील सर्वात ख्यातनाम आणि अष्टपैलू आवाजांपैकी एक असलेल्या आशा भोसले जी यांच्या निधनाने अतिशय दुःख झाले. त्यांच्या अनेक दशकांच्या अद्वितीय संगीत प्रवासाने आपल्या सांस्कृतिक वारशाला समृद्ध केले आणि जगभरातील असंख्य लोकांच्या मनाला स्पर्श केला. भावपूर्ण गीतांपासून ते जोशपूर्ण संगीत रचनांपर्यंत, त्यांच्या आवाजात कालातीत तेज होते. त्यांच्याशी झालेल्या संवादांच्या आठवणी मी सदैव जपून ठेवेन.

त्यांच्या कुटुंबीयांना, चाहत्यांना आणि संगीतप्रेमींना माझ्या भावपूर्ण संवेदना. त्या पुढील पिढ्यांना प्रेरणा देत राहतील आणि त्यांची गाणी सदैव लोकांच्या आयुष्यात गुंजत राहतील.

पंतप्रधान मोदींसह केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी देखील अशा भोसले यांनी श्रद्धांजली वाहिली आहे.

भारतातील सर्वात ख्यातनाम आणि अष्टपैलू आवाजांपैकी एक असलेल्या आशा भोसले जी यांच्या निधनाने अतिशय दुःख झाले. त्यांच्या अनेक दशकांच्या अद्वितीय संगीत प्रवासाने आपल्या सांस्कृतिक वारशाला समृद्ध केले आणि जगभरातील असंख्य लोकांच्या मनाला स्पर्श केला. भावपूर्ण गीतांपासून ते जोशपूर्ण...



## मुख्यमंत्र्यांनी घेतलं अंत्यदर्शन, राज ठाकरे, रामदास आठवलेंसह बॉलिवूड सेलिब्रिटीही आशाताईंच्या निवासस्थानी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : सूरसम्राज्ञी पद्मविभूषण आशा भोसले यांच्या निधनानंतर त्यांचे पार्थिव निवासस्थानी अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आलं आहे. त्यामुळे, अनेक दिग्गज नेतेमंडळी, कलाकार येथे जाऊन अंत्यदर्शन घेत आहेत.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील येथील निवासस्थानी आशाताईंचे अंत्यदर्शन घेतले, यावेळी मंत्री आशिष शेलार हेही सोबत होते.

मुंबई महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे या देखील आशा भोसले यांच्या अंत्यदर्शनासाठी कासा इमारतीमध्ये आल्या होत्या, त्यांनीही आशाताईंच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले.

मनसेप्रमुख राज ठाकरे आणि अमित ठाकरे यांनी देखील आशा भोसले यांच्या निवासस्थानी पोहोचत त्यांचे अंत्यदर्शन घेतले.

प्रसिद्ध गायक जावेद अख्तर आणि शबाना आजमी यांनीही आशा भोसले यांच्या पार्थिवाचे अंतिम दर्शन घेतले, आशाताईंच्या निवासस्थानी अनेक दिग्गज, सेलिब्रिटी अंत्यदर्शनासाठी दाखल होत आहेत

केंद्रीयमंत्री रामदास आठवले यांच्यासह अभिनेता जॅकी श्रॉफ हेही आशा भोसलेंच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेण्यासाठी निवासस्थानी आल्याचं पाहायला मिळालं.

महागायिका आशा भोसले यांच्या निधनामुळे भारतीय सिने संगीताचा सूर हरपला, अशी प्रतिक्रिया रामदास आठवले यांनी दिली, यावेळी त्यांच्या आठवणी ह्या अजरामर राहणार आहेत, असेहीत्यांनी म्हटले.

आपण सगळे दुखत आहोत, देशभरातून शोक व्यक्त केला जातोय. उद्या सकाळी साडे दहा ते दोन वाजेपर्यंत राहत्या घरी अंत्यदर्शन होईल. या काळात लोक आले तर सोईचं राहिलं. त्यानंतर, शिवाजी पार्क स्मशानभूमीत ४ वाजता शासकीय इतमामात अंत्यसंस्कार होतील, अशी माहिती आशिष शेलार यांनी दिली.

शिवाजी पार्क येथील स्मशानभूमीत गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्यांच्या राहत्या घरी कासा या इमारतीमध्ये लोकांनी अंत्यदर्शनासाठी यावं असे आवाहन आनंद भोसले यांच्याकडून करण्यात आलं आहे.

**आता रुग्णाऐवजी थेट कक्षाशी संलग्न असणाऱ्या रुग्णालयामार्फत अर्ज सादर करता येणार**

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीची नवीन ऑनलाईन प्रणाली होणार सुरू; मदत आणि उपचाराला मिळणार गती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील रुग्णांना उपचारासाठी आर्थिक सहाय्य अधिक वेगात मिळणार आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची अद्यावत ऑनलाईन प्रणाली सुरू होणार आहे. या प्रणालीमुळे अर्ज मंजुरीची प्रक्रिया कार्यालयीन ८ तासांत पूर्ण होणार आहे. विशेष म्हणजे आता रुग्णाऐवजी थेट कक्षाशी संलग्न असणाऱ्या रुग्णालयामार्फत अर्ज सादर होणार आहेत. त्यामुळे रुग्णाला कोणत्याही प्रकारचा अर्ज भरावा लागणार नाही. त्यामुळे उपचार प्रक्रियेला गती मिळणार आहे. या प्रणालीचे येत्या काही दिवसातच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उदघाटन करण्यात येणार आहे अशी माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षा कडून देण्यात आली आहे.

गेल्या काही वर्षभरापासून मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षामध्ये नावीन्य पूर्ण रुग्णस्नेही बदल करण्याचे काम सुरु आहे. त्याचाच एक भाग मुख्यमंत्री सहाय्यता निधीची नवी ऑनलाईन प्रणाली असणार आहे. रुग्णाने रुग्णालयात सर्व रीतसर कागदपत्रे दिल्यानंतर रुग्णालय प्रशासन त्याचा अर्ज मुख्यमंत्री सहायता निधी कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठविणार आहे. त्या ठिकाणी नियमानुसार सर्व कागदपत्रे असल्यास अर्ज मंजुरीची प्रक्रिया कार्यालयीन ८ तासांत पूर्ण होणार आहे. यामुळे रुग्ण आणि त्याच्या




नातेवाईकाला मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच, गेल्या आर्थिक वर्षात १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धमर्दाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्षप्रमुख रामेश्वर नाईक म्हणाले की, रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी ही ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात येत आहे. यामुळे आता अर्ज मंजुरीची प्रक्रिया जलद होऊन रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या नवीन प्रणालीचे अधिकृत उद्घाटन लवकरच होणार असून, त्यानंतर राज्यभरात ती प्रभावीपणे राबवण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी गरजू रूग्णांनी १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा.

## पाण्याच्या प्रवाहाचा अंदाज न आल्यानं वैतरणा धरणात दोन तरुण बुडाले, शोधकार्य सुरु

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक : नाशिक जिल्ह्यातील इगतपुरीत धक्कादायक घटना घडली आहे. वैतरणा धरणात नाशिक येथील दोन तरुण बुडाल्याची घटना घडली आहे. वैतरणा धरणालगत असलेल्या धबधब्याखाली चार मित्र पाण्यात उतरले होते. मात्र पाण्याच्या प्रवाहाचा अंदाज न आल्यानं एक जण वाहून गेला. मात्र, त्याला वाचवण्याचा प्रयत्नात दुसराही बुडाल्याची घटना घडली आहे. स्थानिकांच्या मदतीने दोघांचा शोधकार्य सुरु करण्यात आले आहे.

मागील वर्षी याच ठिकाणी अशाच प्रकारची घटना घडली होती. मात्र, पुन्हा एकदा धरण परिसरात सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. दरम्यान, वैतरणा धरणात युवक बुडाल्याची घटना घडल्यामुळं परिसरात खळबळ उडाली आहे. पाण्याच्या प्रवाहाचा अंदाज न आल्यानं एक जण वाहून गेला होता. त्याला वाचवण्यासाठी गेलेला दुसरा युवक देखील पाण्यात वाहून गेला आहे. या दोघांचे शोधकार्. सुरु करण्यात आले आहे. रायगड जिल्ह्यातल्या तळा तालुक्यातील आडनाळे गावात एका तरुणाच्या खिशात मोबाईलचा स्फोट होऊन तरुण गंभीर जखमी झाल्याची घटना समोर आली आहे. महेश नाक्ते असं या तरुणाचे नाव असून त्याने आपल्या पँटच्या खिशात हा मोबाईल ठेवला होता. मात्र अचानक या मोबाईलचा स्फोट घडला आणि या स्फोटात हा तरुण जखमी झाला. सद्यस्थिती मध्ये या तरुणाला एक खासगी रुग्णालयात उपचाराकरिता दाखल करण्यात आले आहे. वाशिम जिल्ह्यातही धक्कादायक घटना घडली आहे. अज्ञात वाहनाच्या धडकेत कारचा भीषण अपघात झाला आहे. यामध्ये कार चालक गंभीर जखमी झाला आहे. तर पत्नी किरकोळ जखमी झाली आहे. या अपघातात दीड वर्षाच बाळ सुखरुप आहे. समृद्धी महामार्गावर वाशिमच्या कारंजा जवळील चॅनल क्रमांक १५९ वरील घटना नागपूर कॉरिडॉरवर एका कारचा भीषण अपघात घडलाय. मुंबईवरुन अमरावती साठी समृद्धी महामार्ग जात असताना लोकेशन क्रमांक १५९ वर अज्ञात वाहनाच्या धडकेत कारचा भीषण अपघात होऊन त्यामध्ये कार चालक श्याम देशमुख गंभीर तर पत्नी जयश्री देशमुख किरकोळ जखमी झाल्या आहेत. तर दीड वर्षीय बालक सुखरुप बचावला आहे. दरम्यान, या अपघातात जखमी झालेल्या जखमींना प्राथमिक उपचारासाठी कारंजा उपजिल्हा रुग्णालयाचे दाखल करण्यात आले आहे. त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.

## संपादकीय....

### आरोग्य बळकटीसाठी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष पुढाकाराने राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याच्या दिशेने राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने बालकांच्या मानसिक आरोग्य बळकटीसाठी एकलव्य फाउंडेशन फॉर मेंटल हेल्थ, पुणे यांच्यासोबत महत्त्वपूर्ण सामंजस्य करार (एमओयू) केला आहे. या सामंजस्य कराराबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, बालकांचे मानसिक आरोग्य हे राज्याच्या उज्ज्वल भविष्याचे पायाभूत तत्व आहे. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून आपण बालकांच्या भावनिक आणि मानसिक सक्षमीकरणासाठी एकत्रित प्रयत्न करण्यात येत आहेत.याचा फायदा भविष्यात होणार असून प्रत्येक बालक आत्मविश्वासाने आणि सकारात्मकतेने आयुष्याचा सामना करू शकेल. हा करार एकलव्य फाउंडेशन फॉर मेंटल हेल्थ, पुणे यांच्यासोबत करण्यात आला आहे.राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये केअरगिव्हर-लेड सेल्फ हेल्प ग्रुप्स च्या माध्यमातून मानसिक आरोग्य सेवा अधिक व्यापक करण्याचा उद्देश आहे. ऑफलाइन आणि डिजिटल माध्यमांचा वापर करून रुग्ण व त्यांच्या कुटुंबियांना आधार देणे, जनजागृती वाढवणे आणि मानसिक आजारांबाबतचा कलंक कमी करणे यासाठी हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. हा कार्यक्रम जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम (डीएमएचपी) सोबत समन्वय साधून राबवला जाणार आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पुढाकारातून करण्यात आलेला हा सामंजस्य करार पुढील तीन वर्षांसाठी कार्यान्वित असणार आहे. या करारामुळे राज्यातील आरोग्य व्यवस्थेत गुणवत्ता, उपलब्धता आणि सर्वसमावेशकता वाढवण्यास मोठी चालना मिळणार आहे.

## पंतप्रधान नरेंद्र मोदी नारी शक्ती वंदन संमेलनाच्या माध्यमातून कर्तृत्ववान महिलांशी संवाद साधणार

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी सोमवार १३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजता नारी शक्ती वंदन संमेलनाच्या माध्यमातून देशातील लोकप्रिय तसेच कर्तृत्ववान महिलांशी विज्ञान भवन येथे संवाद साधणार आहेत. भारताला २०४७ पर्यंत विकसित करण्यासाठी महिलांच्या नेतृत्वात करायच्या कामांविषयी चर्चा करणार आहेत. देशाच्या विकास कार्यक्रमात महिलांचा अधिकाधिक सहभाग असावा याच विचारातून पंतप्रधान मोदी लोकप्रिय तसेच कर्तृत्ववान महिलांशी संवाद साधणार आहेत.

# अधिक सुरक्षित, पारदर्शक शालेय वाहतुकीसाठी राज्य शासन कटिबद्ध : मंत्री प्रताप सरनाईक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत महाराष्ट्र शासनाने शालेय बस व वाहतूक व्यवस्थेबाबत कठोर आणि सर्वसमावेशक नियमावली जाहीर करण्याची तयारी सुरू केली आहे. गृह विभागाने प्रसिद्ध केलेल्या मसुदा अधिसूचनेनुसार, 'महाराष्ट्र मोटार वाहन (शालेय बस नियमन) (प्रथम सुधारणा) नियम, २०२६' लागू करण्याचा प्रस्ताव असून, यात सुरक्षितता, पारदर्शकता आणि जबाबदारी यावर विशेष भर देण्यात आला आहे. या बाबतीत अधिसूचना जाहीर झालेल्या दिनांकापासून पंधरा दिवस या विहित वेळेत संबंधित संकेतस्थळावर सर्व सामान्य जनतेकडून हरकती व सूचना मागविण्यात आल्या असून त्याला योग्य प्रतिसाद द्यावा, असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

**भाडे नियंत्रणावर स्पष्ट नियम**



नवीन नियमांनुसार शालेय बसचे भाडे आता प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडून निश्चित केले जाईल. विद्यार्थ्यांकडून फक्त मासिक भाडेच आकारले जाईल. एकरकमी आगाऊ रक्कम घेण्यास मनाई करण्यात आली आहे. त्यामुळे पालकांना आर्थिक दिलासा मिळणार आहे.

**पालकांच्या तक्रारींवर त्वरित तोडगा**

प्रत्येक शाळेत स्कूल ट्रान्सपोर्ट कमिटी कार्यरत राहणार असून भाडे, सुरक्षितता आणि सेवा यासंबंधी ती कमिटी पालकांच्या तक्रारींचे निवारण करेल. तसेच तिमाही अहवाल सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

**सुरक्षेसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान अनिवार्य**

सर्व शालेय बस व व्हॅनमध्ये GPS-आधारित ऋप्म्त Location Tracking Device (VLTD) व पॅनिक बटण बसवणे बंधनकारक करण्यात आले आहे. याशिवाय अग्निसुरक्षा यंत्रणा (ऋऊअड), उउढत प्रणाली, तसेच सर्व सीट्ससाठी सीट बेल्टची सक्ती केली आहे.

**डिजिटल मॉनिटरिंग प्रणाली लागू**

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक वाहनात डिजिटल सेफ्टी मॉनिटरिंग सिस्टम बसवणे आवश्यक असेल. या प्रणालीद्वारे वाहनाचे लाईव्ह ट्रॅकिंग, डिजिटल उपस्थिती नोंद, स्वयंचलित अलर्ट आणि पालकांना थेट माहिती मिळणार आहे. राज्यस्तरीय प्लॅटफॉर्मशी या प्रणालीचे एकत्रीकरणही करण्यात येणार आहे.

**विद्यार्थ्यांच्या देखरेखीवर विशेष भर**

प्रत्येक विद्यार्थ्याची चढ-उतार वेळेसह दैनिक उपस्थिती नोंदवणे बंधनकारक असेल. विशेषत: पूर्व-प्राथमिक आणि प्राथमिक (इयत्ता ५ वीपर्यंत) विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक प्रवासात महिला परिचारिका किंवा नियुक्त कर्मचारी असणे आवश्यक राहील.

**अपंग व विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सुविधा**

विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षित कर्मचारी, सुलभ प्रवेश व्यवस्था आणि आवश्यक तेव्हा पालकशिक्षक उपस्थितीची तरतूद करण्यात आली आहे.

**कर्मचाऱ्यांची काटेकोर पडताळणी**

बस चालक, वाहक व इतर कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी तपासणी, वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र आणि अधिकृत नियुक्तीपत्र अनिवार्य करण्यात आले आहे. सर्व नोंदी तपासणीसाठी उपलब्ध ठेवणे बंधनकारक असेल.

**नियमांचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाई**

नवीन नियम लागू झाल्यानंतर तीन महिन्यांत सर्व शालेय वाहने नियमांनुसार सुसज्ज करणे आवश्यक राहील. अन्यथा संबंधित वाहनांचे परवाने निलंबित किंवा रद्द करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

शालेय वाहतुकीची नियमित तपासणी शिक्षण व परिवहन विभाग संयुक्तपणे करणार असून, त्याचे अहवाल जिल्हा पातळीवरील समितीकडे सादर केले जातील.

या सुधारित नियमांमुळे शालेय वाहतूक अधिक सुरक्षित, शिस्तबद्ध आणि तंत्रज्ञानाधारित होणार असून, पालक आणि विद्यार्थ्यांचा विश्वास अधिक दृढ होणार असल्याची भावना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केली आहे.

## खामसवाडी येथे महात्मा फुले यांची जयंती उत्साहात साजरी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हनुमंत पाटुळे/खामसवाडी प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी येथे महात्मा फुले यांच्या जयंती निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नूतन जिल्हा परिषदेचे समाज कल्याण सभापती मा. श्री. विश्वास कोकणे, उपसरपंच दयानंद पाटील, माजी उपसरपंच किरण पाटील यांच्या हस्ते महात्मा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले.

**शासकीय सेवेत निवड झालेल्या युवकांचा व पालकांचा सत्कार**

तसेच यावेळी एस.टी. महामंडळामध्ये निवड झालेले अमर चांदपाशा सय्यद व अजर मकबूल बेग तसेच पुणे पोलीस येथे भरती झालेली काजल बालाजी जाधव यांच्या पालकांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी समाज कल्याण सभापती मा.विश्वास कोकणे, उपसरपंच मा.दयानंद पाटील, माजी उपसरपंच मा.किरण पाटील, सोसायटीचे व्हाईस चेअरमन मा.भगवान झोरी यांच्या हस्ते सदरील सत्कार करण्यात आला. यावेळी बाळासाहेब शिरसाट, बालाजी जाधव, राजाभाऊ गर्जे, जगन्नाथ शेळके, भारत बाकले, संतोष माळी, बालाजी चौरे, रेवन माळी, सादिक सय्यद, लिंबराज शेळके, हनुमंत कदम, दिनेश गरड, भगवान शिरसाठ, राजेश गरड, सुंदर माळी, पिंटू चांदणे, रामेश्वर गर्जे, विजय झोरी,धुळाप्पा बंडगर, मनोज माळी, अरुण माळी, बळी कुंभार, बाळासाहेब झोरी,समाधान सावंत, यांच्या सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होत. सदरील कार्यक्रमाचे आयोजन महात्मा फुले विचार मंच खामसवाडी यांच्या वतीने आयोजक श्री. सावता तुकाराम माळी यांच्या वतीने करण्यात आले होते. या वेळी पुढील काळात समाज उपयोगी कार्यक्रम खामसवाडी मध्ये मोठ्या प्रमाणात घेण्यात येतील असे आश्वासन श्री. सावता माळी यांनी यावेळी ग्रामस्थांना दिले.

## चवदार तळ्याचा सत्याग्रह हा मानव मुक्तीसाठी होता : प्रा. डी. डी. मस्के



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गाकयवाड : महाड येथे चवदार तळ्याचा सत्याग्रह डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केला हा सत्याग्रह केवळ पाणी पिण्यासाठी नसून तो समस्त मानव मुक्तीसाठी होता. असे विचार प्रा डी डी मस्के यांनी व्यक्त केले.

बार्शी जिल्हा सोलापूर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह (नवे व जुने) आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले वस्तीगृह यांनी आयोजित केलेल्या समता सप्ताहामध्ये, चवदार तळ्याचा सत्याग्रह आणि मानवी हक्क या विषयावर प्रा डी डी मस्के बोलत होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक क्रांतीचे बंड किंवा मानवतेच्या क्रांतीचा झेंडा उभा करण्याचे निश्चित केले होते. कारण भेटीबंदी, लोटेबंदी, रोटी बंदी आणि बेटी बंदी अशा बंदी तोडण्यासाठी हा संकल्प डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मित्रमंडळीमध्ये जाहीर केला आणि या बंडाची सुरुवात कुठे आणि कशी करावी? हा प्रतिकाराचा लढा कुठून सुरू करावा? याबद्दल विचारविनिमय सुरू केला. प्रथम त्यांनी पंढरपूर या ठिकाणी हा प्रतिकाराचा लढा उभा करावा असा त्यांचा विचार होता. परंतु वारकरी संप्रदायाचे भक्ती पीठ असलेले पंढरपूर अवघा महाराष्ट्र विठ्ठल चरणी लिन होतो. इथेच पहिला हल्ला चढवला तर? परंतु चंद्रभागेचे वाळवंट हे रावबहादूर सि.के.बोले ठरावाच्या कक्षेत बसेल का? त्यासाठीची चढाई व लढाई टिकवता येईल का? कारण त्यात मारामाऱ्या, सरकार दरबार, कोर्ट,कचेऱ्या तुरुंगवास, दंड यात अमाप पैशाचा आणि वेळेचाही व्यय होईल असे त्यांना वाटले म्हणून त्यांनी पंढरपूरचा विचार सोडून दिला.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हा लढा कोकणात करण्याचे निश्चित केले कारण कोकणी माणसे लढाईला फार आसुसलेली असतात. कोकणात पण कुठे? आणि कोणत्या जिल्ह्यात? हा झेंडा उभा करायचा हा विचार मांडताना डॉ.आंबेडकर म्हणाले की, मला रायगडच्या आसपासची जागा हवी. सहकाऱ्यानी विचारले का?

डॉ.आंबेडकर म्हणाले कारण ६ जून १६७४ ला छत्रपती शिवरायांचा राज्याभिषेक रायगड या ठिकाणी झाला. शूद्र म्हणून शिवरायांचा अपमान केला गेला? गागाभट्टाने दक्षिणा घेऊन वेदोक्त पद्धतीने हा राज्याभिषेक केला.

निश्चलपुरी गोसावी हे छत्रपती शिवाजी महाराज यांना म्हणाले की,आपण शुद्र आहात तरीही क्षत्रियत्वाची जागा घेतली.तुम्ही भ्रष्टाचार केला.असे म्हणून तो रायगडावर ठाण मांडून बसला. त्यांनी एक भविष्यवाणी केली.१३ व्या दिवशी,२२ व्या दिवशी आणि ५५ व्या दिवशी अशुभ घटना घडतील.दूर्दैवाने निश्चलापूरी यांची ही भविष्यवाणी खरी ठरली.१३व्या दिवशी मातोश्री जिजाऊसाहेबांचे निधन झाले. २२ व्या दिवशी प्रतापगडावरील अश्व शाळेला आग लागून ती खाक झाली तर ५५ व्या दिवशी सिंहगडावरील महाराजांचा आवडता हत्ती मेला.

छत्रपती शिवाजी महाराज म्हणाले काय केल्याने पापक्षालन होईल?

निश्चलपुरी म्हणाले राज्याभिषेक पुराणोक्त पद्धतीने केला पाहिजे.

हा प्रसंग सांगून डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, मराठ्यांच्या छत्रपतींचे ब्राह्मणांनी इतकी दूर्दशा केली तरी मराठे मूग गिळून का बसले? कायस्थ गप्प का बसले? अहो ही सारी माणसे हिंदू धर्मातील विचारसरणीची गुलाम होऊन बसली होती. गुलामगिरी नष्ट करण्याचा प्रयत्न सत्यशोधक चळवळ करत होती पण ती तशीच आहे. अनंतराव, या गुलामगिरीला चांगला धक्का बसावा व तो अस्पृश्यांच्या क्रांतिकारक समतेच्या चळवळीतून बसावा अशी माझी इच्छा आहे. मग मराठी व इतर तत्सम जातीचे डोळे उघडतील. हे साधले तरी ही मंडळी अस्पृश्यांकडे आपुलकीने पाहावयास लागतील. तेव्हाच हिंदू समाजात सामाजिक समता प्रस्थापित करता येईल म्हणून रायगडाच्या आसपास आपल्या बंडाला क्षेत्र मिळाले पाहिजे.

अनंतराव चित्रे म्हणाले अशी जागा आमच्या महाडला आहे. महाड नगरपालिकेने १९२४ ला बोले ठरावाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. तिथे सुरबानाना टिपणीस हेच नगराध्यक्ष आहेत.

१९ आणि २० मार्च १९२७ ला महाड येथे चवदार तळ्याचा सत्याग्रह करण्याचे निश्चित करण्यात आले.

हा सगळा इतिहास सांगुन प्रा. डी.डी.मस्के पुढे म्हणाले की, मानवी हक्कांच्या साठी डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी साऊथ बरो कमिशन, सायमन कमिशन,गोलमेज परिषदा, समाज समता संघ, संयुक्त राष्ट्रांचा जाहिरनामा इ.बाबत चर्चा केली.

कमलाकर सारंगकर, रमेश गवळी सर यांचे ही समयोचित भाषण झाले.

यावेळी कमलाकर सारंगकर, सुभाष भोसले,व तिन्ही वसतीगृहातील कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते.

**पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' अमंलबजावणी कार्यशाळा संपन्न**

# 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' पशुपालकांच्या आर्थिक व सामाजिक विकासाचे सशक्त माध्यम : मंत्री पंकजा मुंडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजने'च्या माध्यमातून ग्रामीण भागातील नागरिकांना रोजगारक्षम करुन त्यांना 'महाराष्ट्राचा आर्थिक कणा' करण्यावर भर आहे, ही योजना ग्रामीण पशुपालकांच्या आर्थिक व सामाजिक विकासाचे एक सशक्त माध्यम ठरणार आहे, असे प्रतिपादन राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी केले.

पशुसंवर्धन आयुक्तालयातील कामधेनू सभागृहात 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' सादरीकरण व अमंलबजावणी कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी महाराष्ट्र राज्य गोसेवा आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय विभागाचे सचिव डॉ. रामास्वामी एन., पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील, दुग्ध व्यवसाय विकास आयुक्त प्रशांत मोहोड, बुलढाणा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे, पशुसंवर्धन विभागाचे अतिरिक्त आयुक्त डॉ. शीतलकुमार मुकणे, विभागाचे सहसचिव निवृत्तीनाथ मऱ्हाळे, पशुसंवर्धन विभागातील प्रादेशिक पशुसंवर्धन उपायुक्त तसेच जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त उपस्थित होते.

श्रीमती मुंडे म्हणाल्या, मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेच्या माध्यमातून ग्रामीण युवकांना पशुपालनाकडे केवळ पारंपारिक व्यवसाय म्हणून न पाहता एक व्यावसायिक उद्योजकता म्हणून पाहण्यास प्रोत्साहन दिले जात आहे. दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन आणि शेळी-मेंढी पालनासाठी तांत्रिक व आर्थिक मदत देऊन ग्रामीण कुटुंबांचे उत्पन्न वाढवणे, हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. पशुपालनात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन पशुजन्य उत्पादनांची उत्पादकता वाढवणे व स्थानिक स्तरावरच स्वयंरोजगाराच्या माध्यमातून रोजगार विकासाच्या अधिकाधिक संधी निर्माण करण्यावर पशुसंवर्धन विभागाचा भर आहे.

पशुसंवर्धन विभागाच्या या पुढाकारामुळे राज्याच्या ग्रामीण विकास प्रक्रियेला मोठी गती मिळणार आहे. त्यामुळे योजनेत पात्र लाभार्थ्यांची निवड करावी, योजनेत गैरप्रकार होणार नाही, याची दक्षता घ्यावी. ही योजना प्रभावीपणे राबवून यशस्वी करण्याकरिता सर्वांनी प्रयत्न करावेत. योजनेचे जिल्हा, तालुकानिहाय शिबारांचे आयोजन करावे तसेच योजनांची अधिकाधिक जनजागृती करावी. कामाचा महिनानिहाय आढावा घेण्यात येईल. येत्या काळात लाभ वाटपाबाबत भव्य राज्यस्तरीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल, असेही त्या म्हणाल्या.

मंत्री श्रीमती मुंडे पुढे म्हणाल्या, पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून शेळीपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन आदी व्यवसाय करुन शेतकऱ्यांमधून उद्योजक निर्माण होत आहेत. पशुसंर्वधनाला उद्योजकाचा दर्जा दिला पाहिजे. ग्रामीण युवकांना प्रोत्साहन दिले पाहिजे. येत्या काळात वराहपालन व्यवसायावर भर द्यावा, अंड्याचा ब्रँड निर्माण करण्याकरिता सामूहिक दृष्टीकोन ठेवून प्रयत्न करावे. पशुसंवर्धन क्षेत्रात एक जिल्हा एक उत्पादन या तत्वावर काम करावे असे सांगून, परळी वैजनाथ येथे येथील महापशुसंर्वधन एक्स्पोचे यशस्वीपणे आयोजन केल्याबद्दल श्रीमती मुंडे यांनी विभागाचे अभिनंदन केले.

डॉ. रामास्वामी एन.म्हणाले, महाराष्ट्र हे पशुसंवर्धन क्षेत्राला कृषीचा दर्जा देणारे देशातील पहिले राज्य आहे, त्यामुळे विभागाला कृषीचा दर्जा निर्माण करायचा आहे. महाराष्ट्र शासनाच्या 'व्हिजन डाक्युमेंट' विकास क्षेत्रात कृषी आणि पशुसंवर्धन समावेश करण्यात आलेला आहे. 'व्हिजन डाक्युमेंट'च्या धर्तीवर ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी आणि पशुपालन क्षेत्राला आधुनिकतेची जोड देण्यासाठी राज्य शासनातर्फे 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' राबविण्यात येत आहे. अर्थसंकल्पात पशुसंर्वधन विभागाकरिता ४ हजार ५५२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांची निवड, लाभार्थ्यांशी संवाद, वेळेत निधी खर्च, किसान क्रेडिट कार्डचे वितरण, कृत्रिम बुद्धीमत्तेचा प्रभावी वापर, पायाभूत सुविधांचे बळकटीकरण, मनुष्यबळ उपलब्धता आदीबाबत नियोजन करुन काम करायचे आहे, असेही डॉ. रामास्वामी एन. म्हणाले. डॉ. पाटील म्हणाले, पशुसंवर्धन विभागाची पुनर्रचना करुन विभागाला नवी दिशा देण्याचा प्रयत्न करण्यात येत असून यामध्ये जवळपास २७ नवीन योजनांची पुनर्रचना करण्यात आली आहे. ग्रामीण अर्थव्यव्यस्थेला चालना देण्यासोबत यामाध्यमातून रोजगार निर्मितीवर भर देण्यात येत आहे, असेही डॉ. पाटील म्हणाले. याप्रसंगी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकरिता खरेदी करण्यात आलेल्या वाहनांचे श्रीमती मुंडे यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. महापशुधन वार्ता मासिकांचे प्रकाशन करण्यात आले तसेच 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' तयार करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी आणि परळी वैजनाथ येथे येथील महापशुसंर्वधन एक्स्पोचे यशस्वी आयोजन केलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात आले. पशुसंवर्धन आयुक्त पदावरून बुलढाणा जिल्हाधिकारीपदी बदली झालेले डॉ. प्रवीणकुमार देवरे यांना पशुसंवर्धन विभागाच्यावतीने निरोप देऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# श्री विठ्ठल रुक्मिणी पादुका विसावा मंदिराचा जिर्णोद्धार हे आमच्या संस्कृतीचे जतन

## माजी प्रशांतराव परिचारक यांचे प्रतिपादन; मान्यवरांच्या हस्ते झाला मंदिर जीर्णोद्धाराचा शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर वाखरी ते पंढरपूर पालखी मार्गावरील मध्ययुगीन कालखंडापासूनच्या इतिहास लाभलेल्या विठ्ठल रुक्मिणी पादुका विसावा मंदिराच्या जीर्णोद्धार म्हणजे आमच्या संस्कृतीचे जतन करण्याचे आहे यासाठी सर्वतोपरी सहकार्य आम्ही कटिबद्ध आहोत असे प्रतिपादन विधान परिषदेचे माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांनी केली विसावा मंदिराचा जलोदर शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी वारकरी संप्रदायातील मंडळ उपस्थित होते.

यावेळी ह .भ .प .राणा महाराज वासकर महाराज मनाली विहिरीचा जल्लोदार होणे खूप गरजेचे आहे या विहिरीला एक ऐतिहासिक महत्त्व आहे. महिन्यात पंधरा दिवसाला वारकरी येत असतात व त्यांना सुख सुविधा मिळावे यासाठी उपलब्ध होतील उपलब्ध करून देण्यासाठी या पद्धतीने व्यवस्था व्हावी अशा भावना व्यक्त केले.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला विसावा मंदिराचे विश्वस्त व भारतीय जनता पार्टीचे माजी जिल्हाध्यक्ष काशिनाथ थिटे यांनी उपस्थित आमचे स्वागत केले व त्यानंतर माजी आमदार प्रशांत परिचारक, ह भ प शंकर महाराज बडवे, ह भ प राणा महाराज वासकर, डॉक्टर श्री प्रशांत सुरू, ह भ प निवृत्ती महाराज नामदास, ह भ प बापूसाहेब महाराज देहूकर, ह भ प ऋषिकेश उत्पात, मुख्याधिकारी महेश रोकडे, अभंगराव वाकर ह भ प एकनाथ महाराज देशमुख (जळगावकर) रंगाप्पाजी ह भ प विठ्ठल महाराज चवरे, ह भ प आबासाहेब महाराज भोसेकर, समाजसेवक गणेश भाऊ आदटराव, सिकंदर ढवळे, मान्यवर मंडळाचे हस्तेजुलोदारचा शुभारंभ करण्यात आला.

श्री विठ्ठलाचे परंपरागत प्रतिनिधी ह भ प शंकर महाराज बडवे, आणि रुक्मिणीचे परंपरागत प्रतिनिधी श्री ह भ पऋषिकेश उत्पात, यांनी कार्यक्रमाच्या सुरुवातीला अशी वचने दिली या मंदिराला जुन्नोत्तराची व विकासाची प्रास्ताविकातून त्यांनी पंढरपूर नगरपालिकेत नगरसेवक मंदिराचे विश्वस्त व मंदिराचे विश्वस्त सौरभ थिटे यांनी सांगितल्या श्री विठ्ठल रुक्मिणी पादुका विसावा मंदिरी सभावी पंढरपूर हे वारकरी संप्रदायाचे एक महत्त्वाचे स्थान आहे भगवंत परमात्मा पांडुरंग संतांना नेण्यासाठी या ठिकाणी आले त्यामुळेच भगवंताच्या चरणपादुका या मंदिरामध्ये आहेत व भगवंताची व संतांची भेट या ठिकाणी झाली व त्यांचा विसावा झाला यामुळे याला विसावा मंदिर असेही म्हणतात.

आषाढी वारीमध्ये पूर्ण वारी काळात आषाढी दशमी दिवशी याच ठिकाणी सर्व संतांच्या पालख्या विविध मार्गावरून येऊन विसावा मंदिरापाशी संत भेटीसाठी एकत्र येतात.

कार्तिक पौर्णिमेला संत ज्ञानेश्वर महाराजांची वसंत तुकाराम महाराजांची पालखी या ठिकाणी विसावते व पंढरपुरातील नागरिक वारकरी विसाव्या मंदिरापर्यंत माऊलींना व तुकोबारायांना निरोप देण्यासाठी येतात.

कोल्हापूर महालक्ष्मी मंदिरामध्ये जशा किरणोत्सव होतो तसाच किरणोत्सव विसावा मंदिरामध्ये महाशिवरात्रीनंतर सात ते आठ दिवस होत असतो असे या मंदिराचे असणारे महात्मा या प्रसंगी अनेक संत मंडळींनी आपल्या या भाषणातून सांगितले याप्रसंगी हभप राणा महाराज वासकर हभप बापूसाहेब महाराज देहुकर, ह भ प निवृत्ती महाराज नामदास, डॉक्टर प्रशांत सुरू यांनीही मनोगत व्यक्त केली.

मंदिराच्या जिरोदारासाठी पहिल्या टप्प्यातील रंग काढण्याचा पूर्ण खर्च श्री नरसिंह लक्ष्मी देवस्थान नरसिंगपूरचे व आळंदी देवस्थान पूर्व विश्वस्त डॉक्टर प्रशांत सुरू यांनी याप्रसंगी समर्पित केले. ते बोलताना म्हणाले ऐतिहासिक व पुरातत्त्व छान असलेले या मंदिराला जुना तयार करण्यासाठी सेवा मिळण्याची संधी मिळत आहे. ही खूप भाग्याची गोष्ट आहे. या मंदिराचा चांगल्या पद्धतीने जोरदार करण्यासाठी सांगली संवर्धन होण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे.

तसेच सुदाम मोरे यांनी देखील उत्स्फूर्तपणे २५ हजार रुपयांची देणगी याप्रसंगी समर्पित केली मधील जिनादारांमध्ये मंदिर सुरू स्वरूपात आणणे व मंदिराच्या कळसाचे काम तसेच मारुती मंदिराच्या जर्दर असणाऱ्या विहिरीच्या जोरदार व तेथे येणाऱ्या वारकरी भक्तांसाठी आवश्यक असणाऱ्या सोयी सुविधा व सर्व गोष्टी करण्याचे प्रयोजन असल्याचे याप्रसंगी सांगण्यात आले




व कार्यक्रमाच्या शेवटी या मंदिराचे विश्वस्त अभय थिटे यांनी आभार मानले व पसायदानाने कार्यक्रमाची संपूर्ण झाला व या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉक्टर सचिन लादे यांनी केले.

या कार्यक्रमात प्रसंगी हभप सूर्यकांत महाराज मोरे, गणेश महाराज पाथरूडकर, श्रीनाथ महाराज शिरवळकर एकनाथ महाराज पिंपळनेर प्रशांत महाराज ठाकरे माऊली महाराज तार, किशोर महाराज आवटी, माधव महाराज बडवे, मयूर महाराज बडवे पद्मनान महाराज देवडकर, आणि ते भागवत बडवे, नगरसेवक अँड सुनील वाळूजकर, नगरसेवक बालाजी मलपे शरद माने, नगरसेवक आशाताई ढवळे, नगरसेविका नेता ताई प्रचंडे, नगरसेवक लखन चौगुले, नगरसेवक राहुल शिंदे नाईक, पत्रकार महेश खिस्ते, सचिन कुलकर्णी सनी मुजावर, विसावा मंदिराचे विश्वस्त उमेश थिटे, हॅन्ड औदुंबर थिटे, मान्यवर विविध संस्थांची पदाधिकारी इस बायो वाखरी येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## प्रहारचे प्रशांत मुके यांच्या यशस्वी पाठपुराव्यानंतर मनपा एन विभागाचे सहाय्यक अभियंता सचिन खजुरे यांच्याकडून राम नगर(अ) याठिकाणी लावण्यात आले पथदिवे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : रामनगर (अ) ट्रान्झिट कॅम्प येथील मुख्य रस्त्यावर पथ दिवे लावण्याची मागणी प्रहार जनशक्ती पक्षाचे घाटकोपर विधानसभा उपाध्यक्ष प्रशांत मुके यांनी मनपा एन विभागाचे सहाय्यक आयुक्त यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली होती.



डोंगराळ भागात राहणाऱ्या नागरिकांच्या येण्या-जाण्यासाठी रामनगर(अ) ट्रान्झिट कॅम्प हा मुख्य रस्ता असल्याकारणाने सदर रस्त्यावर रात्री उशिरापर्यंत नागरिकांची रहदारी चालू असते. स्थानिक नागरिकांना कामावर जाण्यासाठी तसेच घरी जाण्यासाठी हा मुख्य रस्ता असून लहान मुले,वयोवृद्ध ज्येष्ठ नागरिक,महिला तसेच वाहन चालक यांना रात्रीच्या वेळी या रस्त्यावर अंधार असल्यामुळे येण्या-जाण्यासाठी अत्यंत जिकिरीचे होत होते.याशिवाय या रस्त्यावर होणाऱ्या अंधारामुळे कोणतेही चुकीचे प्रकार याठिकाणी घडू नयेत.म्हणून याठिकाणी तत्काळ पथदिवे लावण्यात यावे अशी मागणी प्रहारचे प्रशांत मुके यांच्याकडून करण्यात आली होती.जेणेकरून या रस्त्यावरून रात्री येजा करणाऱ्या स्थानिक नागरिकांना सुरक्षितता वाटेल.

प्रशांत मुके यांच्या मागणी नंतर आणि यशस्वी पाठपुराव्यामुळे त्यांच्या या मागणीची मनपा एन विभाग प्रशासनाने दखल घेत तत्काळ मनपा एन विभाग परिरक्षण विभागाचे सहाय्यक अभियंता सचिन खजुरे तसेच एन विभाग इलेक्ट्रिशन विभागाच्या गौरी चितळे यांच्याकडून रामनगर(अ) ट्रान्झिट कॅम्प याठिकाणी पथदिवे लावण्यात आले असून सर्व रस्ता आता प्रकाशमय झाला आहे.

तरी स्थानिक नागरिकांनी प्रहार जनशक्ती पक्षाचे घाटकोपर विधानसभा उपाध्यक्ष प्रशांत मुके तसेच मनपा एन विभाग प्रशासन यांनी केलेल्या या कामामुळे स्थानिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

---

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन








**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले.

यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्याकडून उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांचा शाल व श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, आमदार तानाजी सावंत, मंदिर समितीचे सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे, व्यवस्थापक प्रवीणकुमार घम, लेखाधिकारी मुकेश अनेचा यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

---

## निफाडला श्री नवनाथ कथेची काल्याच्या कीर्तनाने सांगता





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : हनुमान जयंतीनिमित्त निफाड येथील अकोलखास गल्ली येथे गेली सात दिवस संगीतमय श्रीनवनाथ कथेचे आयोजन करण्यात आले होते या कथेची सांगता काल्याच्या कीर्तनाने करण्यात आली.

या भक्तीमय सोहळ्यात कोपरगाव येथील कथाकार ह भ प बाळकृष्ण महाराज सुराशे यांचे मधुर वाणीतून ही कथा सात दिवस संपन्न झाली असून श्री नवनाथांच्या चरित्राचे सुंदर असे निरूपण महाराजांनी करून भाविकांना मंत्रमुग्ध केले त्यांचेच मुखातून काल्याच्या कीर्तनात श्रीकृष्ण लीलांचे श्रवण भाविकांनी केले, यावेळी मृदंगाचार्य ह भ प मंगेश महाराज निकम, गायक ह भ प बंडू महाराज धारराव, ह भ प राजेंद्र महाराज थोरात, ह भ प सचिन महाराज जाधव, ह भ प महाजन महाराज व परिसरातील भजनी मंडळ, श्रोते वर्ग यावेळेस उपस्थित होते.

कीर्तनानंतर उपस्थित भावी भक्तांना हनुमान जन्मोत्सव समितीच्या वतीने महाप्रसादाची वाटप करण्यात आले.

---

## मानवता हाच फुले आणि आंबेडकरांच्या समतेचा मुख्य घटक: डॉ. दुष्यंत कटारे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : समता ही केवळ शब्दांची मांडणी नसून ती विचारांची क्रांती आहे. जेव्हा समाजात समतेचा विचार रुजतो, तेव्हाच खर्या अर्थाने समाज परिवर्तनाला गती मिळते. आजच्या धावपळीच्या आणि 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'च्या युगात तंत्रज्ञान जरी प्रगत झाले असले, तरी महापुरुषांच्या वैचारिक वारशाचे काय, असा प्रश्न निर्माण होतो. अशा काळात मानवतेसाठी महात्मा जोतीराव फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला समतेचा संदेश आणि त्यासाठी सांगितलेला शिक्षणाचा मार्ग हाच मानवतेच्या मुक्तीचा खरा मार्ग आहे, असे प्रतिपादन लातूर येथील कै. व्यंकटराव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी केले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्र आणि सामाजिक शास्त्रे संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित भारतरत्न सामाजिक समता सप्ताहात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. महात्मा जोतीराव फुले यांच्या २०० व्या जयंती निमित्त आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या विशेष कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र. कुलसचिव डॉ. अतुल लकडे होते. मंचावर सामाजिक शास्त्रे संकुलाचे संचालक डॉ. गौतम कांबळे, प्राचीन भारतीय इतिहास संस्कृती आणि पुरातत्व शास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. प्रभाकर कोळेकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे अध्यक्ष राजाभाऊ सरवदे आणि वित्त व लेखा अधिकारी महादेव खराडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डॉ. कटारे म्हणाले की, मानवता हाच समतेचा पाया आहे. जोपर्यंत आपण एकमेकांकडे मानवतेच्या दृष्टिकोनातून पाहत नाही, तोपर्यंत सामाजिक समता प्रस्थापित होऊ शकत नाही. महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून विषमतेविरुद्ध जो लढा दिला, तोच लढा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून कायदेशीर आणि नैतिक अधिष्ठानावर नेऊन ठेवला. समतेसाठी शिक्षण हा मुक्तीचा मार्ग आहे, यावर भर देताना डॉ. कटारे यांनी स्पष्ट केले की, शिक्षण म्हणजे समतेने जगण्याची दृष्टी मिळवणे होय. महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोघांनीही शिक्षणाला वाघिणीचे दूध मानले होते, कारण त्यांना ठाऊक होते की शिक्षणाने गुलामगीरी नष्ट होऊन समता प्रस्तापीत होते. अध्यक्षीय भाषणात प्र. कुलसचीव डॉ.अतुल लकडे यांनी विद्यापीठ परिसरात अशा वैचारिक कार्यक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले आणि महापुरुषांचे विचार आत्मसात करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. गौतम कांबळे यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यांनी समता सप्ताहाच्या आयोजनामागची भूमिका विषद करताना, विद्यापीठ कशाप्रकारे सामाजिक बांधिलकी जपत आहे, यावर प्रकाश टाकला. डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी मुख्य वक्ते डॉ. दुष्यंत कटारे यांचा परिचय करून दिला आणि त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची माहिती उपस्थितांना दिली.

या व्याख्यानासाठी विद्यापीठातील विविध विभागांचे प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी आणि पदव्युत्तर विभागाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सामाजिक शास्त्रे संकुलातील कर्मचार्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे डॉ. ज्ञानेश्वरी हजारे यांनी सूत्रसंचालन केले. तर शेवटी हाजीमलंग शेख यांनी उपस्थित मान्यवर, प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले.

---

### जिल्ह्यातील विविध खेळाडू होणार स्पर्धेत सहभागी

## कन्हेरवाडी येथे सटवाई देवी यात्रेनिमित्त व पालकमंत्री सरनाईक यांच्या वाढदिवसा निमित्त क्रिकेट सामन्याचे आयोजन!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


कळंब/प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील कन्हेरवाडी येथील आई सटवाई देवी यात्रा व धाराशिवचे पालकमंत्री ना. प्रताप सरनाईक यांच्या वाढदिवसा निमित्त पालकमंत्री चषक२०२६ या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून त्याची जय्यत तयारी पूर्ण झाली आहे. देवी सटवाई मंदिर परिसर या क्रिकेटच्या महासंग्रामासाठी सज्ज झाले असून मोठ्या संख्येने संघ यात सहभागी होत आहेत.

या बाबत सविस्तर माहिती अशी की, कळंब तालुक्यातील मौजे कन्हेरवाडी येथील देवी सटवाई देवची यात्रा येत्या पौर्णिमेला मोठ्या प्रमाणात भरत असते. या यात्रेचे व धाराशिवचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दिनांक १५ एप्रिल २०२६ ते २५ एप्रिल२०२६ पर्यंत क्रिकेट सामने ठेवण्यात आल्याची माहिती आयोजकांकडून सांगण्यात आली आहे. पालकमंत्री चषक २०२६ या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटक म्हणून धाराशिव शिवसेना जिल्हाप्रमुख अजितदादा पिंगळे, उमरगा नगराध्यक्ष किरण भैया गायकवाड, कळंब कृ.उ. बाजार समितीचे सभापती शिवाजी आप्पा कापसे, कळंब प.समीती सभापती सौ.राजश्रीताई वरपे,जि.प सदस्य अनंत बाबा लंगडे, शिवसेना कळंब तालुका अध्यक्ष लक्ष्मीकांत हुलजुते हे उपस्थित राहणार आहेत. तर यावेळी देवी सटवाई परिसर क्रिकेटच्या जल्लोषात न्हाउन निघणार आहे ना. प्रताप सरनाईक यांच्या नावाने पालकमंत्री चषक २०२६ या क्रिकेट स्पर्धेची तयारी पूर्ण झाली आहे. या प्रतिष्ठेच्या स्पर्धेचे आयोजन शिवसेना (शिंदे गट) कन्हेरवाडी यांच्या वतीने करण्यात आले आहे. यामध्ये उपसरपंच विजय उर्फ सोनू कवडे, तंटामुक्ती अध्यक्ष कपिल दादा कवडे, आणि माजी उपसरपंच मधूकर बप्पा मिटकरी यांच्यासह गावातील युवकांनी पुढाकार घेतला आहे. जिल्ह्यातील विविध खेळाडू या स्पर्धेत सहभागी होणार असून क्रिकेट प्रेमींना थरारक आणि दर्जेदार सामने पहिल्यांदाच अनुभवायला मिळणार आहेत.



१५ एप्रिल ते २५ एप्रिल २०२६ या कालावधीत मंदिर परिसरात ही स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेसाठी प्रथम बक्षीस ५१हजार रुपये, द्वितीय बक्षीस ३१हजार रुपये, तृतीय बक्षीस २१हजार रुपये, तर चतुर्थ बक्षीस १५ हजार रुपये अशा प्रकारे बक्षीस ठेवण्यात आले आहे. या स्पर्धेकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागून राहिले असुन क्रिकेट प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून खेळाडूंचा उत्साह वाढवावा असे आवाहन आयोजक व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# आमदार अभिजीत पाटील यांच्या पाठपुराव्याला यश, माढा शहरात अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय झाले मंजूर




## ऐतिहासिक निर्णयामुळे वेळ आणि पैशाची बचत होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सतत माढा मतदार संघाच्या नवीन नवीन योजना व प्रकल्प मांडण्यामध्ये आमदार अभिजीत पाटील हे नेहमीच कार्यरत दिसत आहेत. परंतु माढा मतदारसंघात जिल्हा व सत्र न्यायालय मंजुरीसाठी आमदार अभिजीत पाटील हे सतत प्रयत्न करत असल्याने आनंदाची बाब म्हणून माढा तालुक्यासाठी हा एक मोठा ऐतिहासिक निर्णय मानला जात आहे. माढा परिसरातील नागरिकांना आता बार्शीला जाण्याची गरज उरणार नाही त्यामुळे वेळ आणि पैशाची बचत देखील होईल.

प्रलंबित खटल्यांचा निपटारा अतिरिक्त जिल्हा न्यायालय झाल्यामुळे स्थानिक पातळीवर गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्याची आणि दिवाणी खटले जे कामकाज जलद गतीने चालवण्यास मदत होईल. हो वकिलांसाठी सोय स्थानिक वकिलांना आता वाड्यातच जिल्हास्तरावरील कामकाज पाहण्याची संधी मिळेल.

आमदार अभिजीत पाटील यांनी त्यांच्या निवडणूक प्रचारादरम्यान आणि त्यानंतरही मतदारसंघातील प्रशासकीय सोयीसुविधांसाठी सतत प्रयत्न केले होते. या न्यायालयाच्या मंजुरीमुळे माढा शहराचा वैभव वाद भर पडली असून नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे या निर्णयामुळे माढा तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांना आणि पक्षकारांना मोठा दिलासा मिळाला असून आता गंभीर स्वरूपाच्या खटल्याच्या सुनावणीसाठी सोलापूरला जाण्याची गरज भासणार नाही.

आमदार अभिजीत पाटील यांची प्रतिक्रिया.

मळ्यातील जनतेला न्याय मिळवण्यासाठी दूरवर पायपीट करावी लागू नये, हे आमचे ध्येय होते व या न्यायालयाच्या मंजुरीमुळे माढ्याचा प्रशासकीय दर्जा उंचावला आहे. हे न्यायालय लवकरात लवकर करावीत व्हावे यासाठी आवश्यक असलेल्या इमारतीची आणि पायाभूत सुविधांचे कामाची आम्ही प्राधान्याने पूर्ण करून घेऊ, यामध्ये राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा ताई पवार, व जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार भाऊ गोरे यांचे मनापासून आभार व्यक्त करतो की आई ऐतिहासिक निर्णयाबद्दल माढा शहर व तालुक्यातील नागरिक, वकील संघ आणि राजकीय कार्यकर्त्यांनी आमदार अभिजीत पाटील यांचे विशेष आभार मानले आहेत.

# भीम प्रतिष्ठान तर्फे विविध उपक्रम राबवून क्रांतीसुर्य महात्मा फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : स्त्रियांचे उद्धारक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महात्मा ज्योतिराव फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त भीम प्रतिष्ठान कडून विविध उपक्रमाच्या माध्यमातून महात्मा फुले यांना अभिवादन करण्यात आले, शालेय साहित्य वाटप, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, तसेच भेट संविधानाची या उपक्रमातून संविधानाची प्रास्ताविके ची फ्रेम विविध शाळा, कार्यालये आणि मंडळांना भेट देण्यात येणार आहे.भीम प्रतिष्ठान गेलीस २६ वर्षे विविध उपक्रमाच्या माध्यमातून आपल्या प्रतिष्ठान तर्फे सामाजिक कार्य करीत आहेत.




तत्पूर्वी प्रारंभी महात्मा फुले यांच्या पुतळ्याला हार घालून भीम प्रतिष्ठान कडून अभिवादन करण्यात आले. यावेळी भीम प्रतिष्ठानचे अध्यक्ष वीरेंद्र हिंगमिरे, संस्थापक दलितमित्र. बाबा बाबरे, सचिव अकबर शेख, कार्याध्यक्ष सिद्धांत बाबा बाबरे, मारुती खानापुरे, प्रेम अंकुश आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# बार्टी संस्थेत क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले यांना अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे संचलित शासकीय सफाई कामगारांच्या मुला मुलांची निवासी शाळा, येरवडा, पुणे येथे क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेस बार्टी संस्थेच्या निबंधक डॉ सुचिता शिंदे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



यावेळी विभागप्रमुख शुभांगी पाटिल, रविंद्र कदम, डॉ बबन जोगदंड, यांनीही अभिवादन केले.

सामाजिक समता सप्ताह अंतर्गत एकपात्री नाटक

मी सत्यशोधक महात्मा जोतीराव फुले बोलतोय

सादरकर्ते कुमार आहेर यांनी जोतीराव फुले व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील अनेक पैलूंवर प्रकाश टाकून त्यांनी मानवतेच्या कल्याणासाठी केलेल्या कार्याचा गौरव केला. फुले शाहू आंबेडकरी विचारानेच आपला उद्धार होऊ शकतो. विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणाची कास धरून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि बार्टीच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.

एकपात्री नाटकाला विद्यार्थ्यांनी मोठा प्रचंड प्रतिसाद देऊन त्यांचे स्वागत केले.

यावेळी लेखाधिकारी नितिन चव्हाण, कार्यालय अधिक्षक प्रज्ञा मोहिते, मुख्याध्यापक श्रीमती चेंडगे, यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी तसेच शिक्षक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महात्मा फुले यांच्या शाश्वत कार्यामुळे समाज परिवर्तनास दिशा मिळाली : प्रा. डॉ. संगमेश्वर निला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : महात्मा फुले यांनी मुलींसाठी शिक्षणाचे द्वारे खुली केली, अस्पृश्य पददलितांसाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे समाज परिवर्तनात गती मिळाली त्यांच्या शाश्वत कार्यामुळे विकासाचा मार्ग दिसला असे प्रतिपादन राज्यशास्त्राचे अभ्यासक डॉ संगमेश्वर निला यांनी केले.




**महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त रासेयो व राज्यशास्त्र विभागाच्या वतीने व्याख्यान कार्यक्रम**

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा फुले यांची २००व्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी होते. व्यासपीठावर प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे उपस्थित होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, अंधश्रद्धा, रूढी,परंपरा चालीरीती यामुळे समाजाची अधोगती झाली होती, शेतकऱ्यांची अवस्था बिकट झाली होती, अशा परिस्थितीत त्यांनी समाज परिवर्तनाचा मार्ग सुखकर व्हावा म्हणून केलेले प्रयत्न खरोखरच वंदनीय आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ एस आर लोखंडे यांनी केले सूत्रसंचलन प्रा डॉ शितल झिंगाडे-भस्मे यांनी केले तर आभार प्रा सौरभ भस्मे यांनी मानले. कार्यक्रमास कार्यक्रम अधिकारी प्रा राजशेखर पवार, प्रा हर्षदा गायकवाड, शितल फुटाणे, डॉ बाळासाहेब पाटील, मधुबाला लोणारी, मनीषा शिंदे, प्राची गणेचारी व विद्यार्थी वाले उपस्थित होते.

**महात्मा फुले यांच्यामुळे प्रगतीचा नवा मार्ग दिसला**

**महात्मा फुले यांचे विचार समता,शिक्षण आणि लोकशाही मूल्यावर आधारित होते त्यांनी दुर्बल समाजाला सशक्त करण्यासाठी प्रयत्न केले त्यामुळे प्रगतीचा नवा मार्ग दिसला असे प्रतिपादन प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी यांनी केले.**

# स्वाक्षरीतून प्रेरणा- आंबेडकर जयंतीनिमित्त उल्लेखनीय व्यक्तींचा सन्मान उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर / प्रतिनिधी :

महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सोलापूरात एक आगळावेगळा आणि प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात येत आहे. जनता संघर्ष न्यूजच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना बाबासाहेबांच्या स्वाक्षरीचे प्रतीक असलेले विशेष पेन भेट देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

शिक्षण, सामाजिक कार्य, आरोग्य सेवा, पत्रकारिता तसेच इतर क्षेत्रांत योगदान देणाऱ्या मान्यवरांचा या उपक्रमातून गौरव केला जाणार असून, त्यांच्या कार्याला सलाम करण्याचा हा एक छोटासा प्रयत्न आहे.

या उपक्रमामागील संकल्पना स्पष्ट करताना आयोजक व पत्रकार सिद्धार्थ भडकुंबे म्हणाले, ज्ञान, समता आणि न्याय या बाबासाहेबांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे आणि नव्या पिढीला त्यातून प्रेरणा मिळावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. जयंतीनिमित्त केवळ स्मरण न करता त्यांच्या विचारांचे आचरणात रूपांतर व्हावे, हीच अपेक्षा आहे.




डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा दीप पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.

# उजनी धरणातून भीमा नदीत तातडीने पाणी सोडण्याची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर सध्या वाढत्या उन्हामुळे भीमा नदीपात्रातील पाणीसाठा अत्यंत कमी झाला असून उपलब्ध पाणी केवळ पुढील सात ते आठ दिवस पुरेल. अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे त्यामुळे नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असून शेतीसाठी पाण्याची टंचाई जाणू लागली आहे. या पार्श्वभूमीवर स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने उजनी धरणातील भीमा नदी पात्रात तातडीने पाणी सोडण्याची मागणी करण्यात आली आहे. याबाबत कार्यकारी अभियंता भीमा पाटबंधारे विभाग उजनी यांना निवेदन देण्यात आले. यावेळी संघटनेचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले की पाणीटंचाईमुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी तसेच शेतकऱ्यांना शेतीसाठी मोठ्या अडचणीचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे प्रशासनाने तातडीने निर्णय घेऊन उजनी धरणात पाणी सोडावे अशी मागणी करण्यात आलेली यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष तानाजी बागल, सचिन पाटील, सचिन आटकळे, नानासाहेब चव्हाण, समाधान चव्हाण इत्यादी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.



**१५ पेक्षा अधिक महसूल सेवांचा लाभ; नागरिक, शेतकरी, महिला व विद्यार्थ्यांचा मोठा सहभाग**

# पडघ्यात 'छत्रपती शिवाजी महाराज राजस्व शिबिराला' उत्स्फूर्त प्रतिसाद; ५५२ दाखल्यांचे वाटप





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील पडघा परिसरात महसूल विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज राजस्व शिबिराला' नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. १० एप्रिल २०२६ रोजी कुरुंद येथील बी. बी. पाटील हायस्कूल येथे हे शिबिर पार पडले. शहरी व ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला आणि विद्यार्थ्यांपर्यंत शासकीय सेवा प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी हे विशेष जनजागृती अभियान राबविण्यात आले.

या शिबिरामध्ये महसूल विभागाच्या विविध सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या. प्रलंबित फेरफार प्रकरणे निकाली काढणे, ७/१२ उताऱ्यातील चुका दुरुस्त करणे, डिजिटल स्वाक्षरीचे ७/१२ व ८-अ उतारे वितरित करणे, उत्पन्न, रहिवासी व जात प्रमाणपत्र, नॉन-क्रीमीलेअर प्रमाणपत्र देणे, तसेच अकृषिक (NA) परवानगी व संबंधित तरतुदींविषयी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच नव्या व्यवस्थापनानुसार 'सनद प्रक्रिया'ची माहिती, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचा लाभ, विद्यार्थ्यांसाठी विविध दाखले, तुकडेबंदी कायद्याशी संबंधित प्रकरणांचा निपटारा, घरकुलासाठी पट्टे वाटप, ई-मोजणी अर्ज, ॲग्रीस्टॅक व पीएम किसान नोंदणी अशा १५ पेक्षा अधिक सेवांचा लाभ नागरिकांना देण्यात आला. या शिबिरादरम्यान एकूण ५५२ विविध प्रकारचे दाखले वाटप करण्यात आले. त्यामुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले. हे शिबिर भिवंडीचे तहसीलदार अभिजीत खोले व उपविभागीय अधिकारी अमित सानप यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. पडघा मंडळ अधिकारी संतोष आगिवले यांनी विशेष परिश्रम घेतले. तलाठी रोहन पवार, विजय लोहकरे, संजीव धात्रक, नरसूबाबा तुगावे, गणेश पाटील, राहुल चित्ते, चित्रा विशे यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनात सहभाग नोंदविला.

यावेळी भिवंडी भूमी अभिलेखचे सचिन हमजादे, नायब तहसीलदार आदेश म्हात्रे, शिवसेना नेते प्रकाश पाटील, माजी पंचायत समिती सदस्य एकनाथ पाटील, बी.बी. पाटील स्कूलचे संस्थापक बी.बी. पाटील, माजी मंडळ अधिकारी दूधसागरे, माजी सरपंच रवींद्र विशे, मनसे भिवंडी लोकसभा जिल्हाध्यक्ष शैलेश बिडवी, माजी सरपंच सायली पाटील, सदस्य अजय चव्हाण यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

एकूणच, महसूल विभागाच्या या उपक्रमामुळे नागरिकांना विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी सुलभपणे उपलब्ध झाल्याने या शिबिराचे सर्वत्र कौतुक होत आहे.